# कोर्ट पैरवी

श्रीमती माणिक पत्की

पोलीस निरीक्षक

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विदयालय,

नाशिक

# कोर्ट पैरवीची नियुक्ती.

## शासन निर्णय क्र डि पी पी 2012/प्र क्र.10/पोल 10 दि.12 मे 2015

- पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येते.
- त्या अनुषंगाने दोषारोप सिध्दीकरीता खटला सुरु होतो.
- खटल्याच्या प्रत्येक सुनावणीकरीता संबधित साक्षीदार,पंच व पोलीस अधिकारी यांना न्यायालयामध्ये उपस्थीत रहावे लागते.

- सुनावणीपुर्वी शासकिय अभियोक्तयासोबत संबधित पोलीस अधिकरी,साक्षीदार,पंच यांची पुर्व चर्चा घडुन येत नसल्याने दोषारोप सिध्दिचे प्रमाण घटत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.
- सबब प्रत्येक खटल्याच्या सुनावणीपुर्वी अशी पुर्व चर्चा घडवुन आणण्याकरीता समन्वय अधिका—याची आवश्यकता विचाराज घेवुन प्रत्येक न्यायालयात एका पैरवी अधिकाऱ्याची नियुक्ती होते.

# कोर्ट पैरवी कोण असावा

- पैरवी अधिकारी हा पोलीस हवालदार किंवा सहायक पोलीस उप निरीक्षक या दर्जाचा असावा
- सदरचा पैरवी अधिकारी न्यायालयात सुरु असलेल्या खटलयाचा दैनंदिन आढावा घेवुन खटलानिहाय शासकिय अभियोक्त्या सोबत पोलीस अधिकरी , साक्षीदार व पंच यांची पुर्व चर्चा घडवुन आणण्याची जबाबदारी पार पाडेल.
- प्रत्येक न्यायालयात एक पैरवी अधिकारी याप्रमाणे १२९१ इतक्या पैरवी अधिकारी पदांची निर्मिती केली आहे.

# कोर्ट पैरवीच्या जबाबदाऱ्या

- गुन्हयाचे दोषसिध्दी प्रमाण वाढविण्यासामध्ये कोर्ट पैरवी यांनी कशाप्रकारे काम करावे.
- खटला चालु असताना कोर्ट पैरवी यांनी साक्षीदार,पंच च तपासी अधिकारी यांना त्यांचे शी संबधित कामकाजाबाबत पुर्वकल्पना देणे व समन्वय साधणे.
- केसेसची सुनावणी चालु असताना एखादया सरकारी अभियोक्त्याकडुन सरतपासणी यामध्ये जास्त अंतर राहु नये यासाठी पैरवी अधिकाऱ्यांनी लक्ष देवुन साक्षीदारांना ब्रिफिंग करावे तसेच सरकारी अभियोक्ता यांचेशी नेहमी समन्वय ठेवावा.

- पैरवी अधिकारी यांना खटल्यांचे सुनावणी दरम्यान येणाऱ्या अडीअडचणी संदर्भात अहवालांची पुर्तता होत नसल्यास संबधित पोस्टे प्रभारी अधिकारी,उप विभागीय अधिकारी यांना सत्वर कळवावे.
- स्दर गुन्हयातील अहवालाबाबत संबधिताना कळविल्याबाबत आपले दैनंदिन रजिस्टर मध्ये नोंदी घ्यावयात.
- न्यायालयात महत्वाच्या केसेसची सुनावणी चालु असताना साक्ष दरम्यान काही लोक न्यायालयात जमा हावुन अडचणी निर्माण होवु शकतात.
- यासाठी पैरवी अधिकारी यांनी आगावु माहीती घेवुन पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना लागलीच कळवावे.

- भारतीय दंड संहीता विधानाखाली गुन्हे शाबीतीचे प्रमाण वाढविण्याकरीता दैनंदिन न्यायालयाचे बोर्डावर येणा—या केसेसची माहीती पैरवी अधिकारी यांनी संकीलत करावी. त्यावरुन सदर गुन्हयात जप्त मुद्येमाल कोर्टात दाखल आहे का
- सी.ए. तपासणीसाठी पाठविण्यात आलेला मुद्येमाल
- त्याचा सी ए अहवाल मुळ कागदपत्रात दाखल करण्यात आला आहे का?
- बोर्डावर आलेलया केसेसची संपुर्ण फाईल व्यवस्थित आहे का?

- त्यात लावण्यात आलेले कागदपत्र परिपुर्ण आहे का ?याबाबत रिपोर्ट /तज्ञांचे अहवाल/मेडीकल रिपोर्ट/समन्स/वॉरंट कोर्टात वेळेत दाखल केलेले आहे किंवा नाही
- याबाबत पैरवी अधिकारी यानी वैयक्तिक लक्ष घालुन मुदतीत पुर्तता करुन घ्यावी.
- पैरवी अधिकारी यांनी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी ,सरकारी वकील व मा.कोर्टाचे संपर्कात राहुन केसेस शाबीत होईल या दृष्टिने त्यांचा समन्वय घडवुन आणावा.

- तसेच पेरवी कामकाजादरम्यान साक्षीदारांना ब्रिफींग करण्यासाठी सरकारी अभियोक्ता सहकाय्र करत नसल्यास त्याबाबत पैरवी अधिकारी यांनी त्यांचे नावासह माहीती पोलीस अधिक्षक यांना कळवावी.
- सत्र न्यायालयात साक्ष संदर्भात बाहेर गावावरुन येणारे तपासी अंमलदार यांना कोर्टात साक्षीपुर्वी केस संदर्भातील कागदपत्रे अवलोकन करीता पुरेसा वेळ मिळत नसल्याने पैरवी अधिकारी यांनी अशा प्रकारच्या केसेसच्या सुनावणीपुर्वी सदर केसेसच्या कागदपत्रांचे अवलोकन करुन तपासी अंमलदार यांचे करीता केले तपासाबाबत थोडक्यात माहीती संकलित करुन केसडायऱ्या प्राप्त करुन त्यांना दिल्यास गुन्हयाच्या शाबीतीचे दृष्टिने चांगल्याप्रकारे साक्ष देण्यास मदत होवु शकते.

- पोलीस अभियोक्ता यांनी जितक्या साक्ष समन्स काढले ते साक्षीदार आल्यावर प्रत्येक साक्षीदाराची साक्ष त्याच दिवशी होईल त्यासाठी पैरवी अधिकारी यांनी सरकारी अभियोक्त्यांना विनंती करावी.
- साक्षीदार यांना विनाकारण साक्षीसाठी जास्त वेळा येण्याचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

# कोर्टाच्या कामकाजात कोर्ट पैरवींना येणाऱ्या अडचणी

कोर्ट पैरवी यांनी कोर्टाचे कामकाज करताना प्रत्यक्ष रुपात येणा—या अडचणींचा सामना कशाप्रकारे करावा व त्या सोडवताना काय उपाययोजना कराव्यात.

# कोर्ट पेरवी आणि कामकाज समन्वय

- प्रत्येक शनिवारी उप विभागीय अधिकारी हे रोटेशनप्रमाणे आपले कार्यक्षोतील वेगवेगळे पोलीस ठाणे येथे सर्व पैरवी अधिकारी यांची बैठक घेवुन केलेल्या व करावयाच्या कामकाजाचा आढावा घेतील.
- पैरवी अधिकारी यांच्या वरील समन्वय बैठकित सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकरी यांनी उपस्थित राहणे गरजेचे आहे.
- पैरवी अधिकारी यांनी त्यानी केलेल्या दैनंदिन कामकाजाची नोंद एका रजिस्टर मध्ये नोंदवुन ठेवावे

# पैरवी अधिकारी यांना सुचना

- मा.न्यायालयात खटला चालु असताना साक्षकामी फिर्यादी,पिडीत,साक्षीदार,सरकारी पक्षाचे महत्वाचे साक्षीदार,गुन्हयातील मुद्येमाल, वैदयकिय अहवाल व रासायनिक विश्लेषण तज्ञांचे अहवाल इ.मा. न्यायालयासमोर सादर होणे जरुरी आहे.
- अन्यथा आरोपीस त्याचा फायदा मिळु शकतो.
- संबधित न्यायालयाच्या पैरची अधिका—याने उपरोक्त साक्षीदार,पुरावे न्यायालयासमक्ष उपस्थित होत आहेत. न्यायालयाच्या खटल्याच्या संबधात दिवस भराच्या कामकाजाविषयी तपशिल ,त्यांचे नोदवहीत लिहावा

- सदर बाबत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना अवगत करावे.
- खटल्याच्या सुनावणीसाठी पुढील तारखेला न्यायालयात साक्षकामी उपस्थित करण्यात येणाऱ्या साक्षीदारास समन्स मिळाले किंवा कसे याबाबत खात्री करावी.
- साक्षीदारास त्याने गुन्हयाच्या तपासात दिलेल्या जबाबाची प्रत दाखवून साक्षकामी त्यास तयार करावे.
- तसेच न्यायालयात सादर करण्याकरीता मुद्देमाल अगोदरच पोलीस ठाण्याकडुन प्राप्त करुन न्यायालयात सादर करण्यात येत आहे याची दक्षता घ्यावी.

- सरकारी अभियोक्ता खटल्यातील सर्व साक्षीदार, मुद्येमाल सादर करीत आहेत याची खा्त्री करावी.
- काही गैरप्रकार आढळल्यास सदर बाबत त्वरीत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना अवगत करावे.
- खटल्याचा निकाल लागल्यानंतर प्रत मा. न्यायालयातुन तात्काळ प्राप्त करुन पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना पुढील कार्यवाहीकरीता देण्यात यावी.
- पैरवी अधिकारी यांनी दिवसभराच्या खटल्याच्या कामकाजाची नोंद घेणकरीता ठेवण्यात आलेल्या रजिस्टरमध्ये दिवसभरात संबधित खटल्याच्या सुनावणी दरम्यान झालेल्या कामकाजाची माहीती भरावी.
- तसेच सदर बाबत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना अवगत करावे.

- न्यायालयातील पैरवी अधिकारी हा न्यायालय व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांच्या मधील दुवा असुन न्यायालयात सुनावणी दरम्यान झालेल्या कामकाजाची माहीती पैरवी अधिकारी यांनी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना दयावी.

# कोर्ट पेरवी आणि कामकाज समन्वय

- पैरवी अधिकारी यानी देनंदिन सुनावणींबाबत रजिस्टर ठेवावे.
- त्यामध्ये सविस्तर नोंदी घ्याव्यात
- प्रत्येक कोर्ट केस साठी पुरेशी पाने राखुन ठेवावीत.
- सुनावणी झालेल्या खटल्यांच्या दैनंदिन सुनावणी रजिस्टरचा उतारा सुनावणीनंतर त्याच दिवशी अपर पोलीस अधिक्षक, ट्रायल मॉनिटरिंग सेल यांना सादर करुन प्रत उपविभागीय पोलीस अधिकारी यांना न चुकता पाठवावी.

# धन्यवाद

श्रीमती माणिक पत्की
पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय,
नशिक